**करारनामा**

( ज़िल्हा अधिक्षक कृषि अधिकारी........ व सुक्ष्म सिंचन संच वितरक यांच्यामध्ये करावयाचा करारनामा )

आज दिनांक रोजी वार या दिवशी

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग, तर्फे

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.........

..........लिहून घेणार

यांसी ..................

मे.......................................

रजि. ऑफिस.................................

.................................................

.................................................

(नोंदणीकृत वितरक)

तर्फे श्री.......................................

पदनाम .........................................

रा..................................................

...................................................

...................................................

....लिहून देणार

मी/आम्ही खालीलप्रमाणे लिहून घेणार व लिहून देणार कारणे करारनामा लिहून देतो/घेतो की,

**ज्याअर्थी** महाराष्ट्र राज्य शासनाने (यापुढे "राज्य शासन"असा उल्लेख करण्यात आलेला आहे) केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन अभियान सन २०१०-११, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत शेतावरील पाणी व्यवस्थापन (On Farm Water Management) किंवा इतर केंद्र /राज्य पुरस्कृत योजनेच्या माध्यमातून अधिकृत वितरकांमार्फत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन संच पुरविण्याची योजना अंगिकारली आहे.

**ज्याअर्थी** केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन अभियान सन २०१०-११ अन्वये केंद्र शासनाने/राज्य शासनाने काही मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या असून त्याधर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य ,पुणे यांनी देखील पत्र दिनांक १/१०/२०१४ अन्वये व वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत / केल्या जातील.

**ज्याअर्थी** महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे व त्यामधील अटी व शर्तींचे अनुपालन करणा-या व पात्र ठरणा-या अधिकृत वितरक यांचेकडून विहीत नमुन्यात अर्ज मागवून, त्या अर्जांची विहीत केलेल्या निकषांनुसार छाननी करून लिहून देणार यांना ........................जिल्ह्यातील विविध तालूक्यामध्ये

सन २०१४-१५ मध्ये विविध योजनेअंतर्गत सुक्ष्म सिंचन संच पुरविण्यास लिहून देणार यांनी मान्यता दिलेली आहे.

**ज्याअर्थी** जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी......... (यापुढे लिहून घेणार असा उल्लेख करण्यात आलेला आहे ) यांना शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार तसेच कृषि आयुक्तालय पुणे यांच्याकडून निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना, अटी व शर्ती तसेच राज्य शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या तसेच खालील अटी व शर्ती लिहून देणार यांना चर्चेअंती मान्य आहेत.

**त्याअर्थी** लिहून देणार यांचेवर खालील अटी व शर्ती बंधनाकारक राहतील व त्या अटी व शर्तीचे अनुपालन करण्याची लिहून देणार हे करारनाम्याने हमी देत आहेत.

**अटी व शर्ती**

१. शेतक-यांच्या शेतावर बसविलेला सुक्ष्म सिंचन संच किमान तीन वर्ष सुस्थितीत कार्यान्वित राहील, यासाठी शेतक-याला आवश्यक मार्गदर्शन करण्याची व प्रशिक्षण देण्याची हमी लिहून देणार देत आहेत.

२. शेतक-याकडून / त्यांचे प्रतिनिधीकडून प्राप्त झालेल्या लेखी व रास्त तक्रारीचे निराकरण ७ दिवसांच्या आत करणे, तसेच कृषि विभागाच्या संबंधित अधिका-यांनी तपासणीच्यावेळी दिलेल्या लेखी सूचनांचे पालन करणे आणि निर्देशित केलेल्या त्रुटींची पूर्तता वेळेवर करणे लिहून देणार यांच्यावर बंधनकारक राहील याची लिहून देणार यांना जाणीव आहे व ते त्यांना मान्य आहे.

३. सुक्ष्म सिंचन संच चालविण्याच्या तांत्रिक बाबींची माहिती असलेली मराठी भाषेतील पुस्तिका शेतक-यास संच कार्यन्वित करतानाच उपलब्ध करून देण्याची जबाबदारी लिहून देणार यांच्यावर राहील.

४. लिहून देणार हे ......या कंपनीचे अधिकृत वितरक/विक्रेते असून त्या कंपनीने पुरविलेल्या बीआयएस दर्जाच्या व ब्रॅन्डनेमच्या साहित्यांचा वापर शेतक-यांच्या शेतावर बसविण्यात येणा-या सुक्ष्म सिंचन संचामध्ये करणार असून वितरकांनी दिलेल्या बिलाप्रमाणे असणा-या साहित्यासाठी लिहून देणार हे जबाबदार राहतील.

५. लिहून देणार यांच्याकडून शेतकऱ्यांची किंवा शासनाची कोणत्याही प्रकारची फसवणूक होणार नाही, याची लिहून देणार हमी देत आहे. तसेच लिहून देणार .................कंपनीचे सूक्ष्मसिंचन संच योजनेकरिता अधिकृत प्रतिनिधी आहेत व त्यांच्यामार्फत काही गैरव्यवहार/अनुचित प्रकार घडल्यास लिहून देणार हे व्यक्तिगतरित्या त्यास जबाबदार राहतील.

६. शासननिर्णय दिनांक ०७ जुलै, २०१४ मधील तरतुदींनुसार सुक्ष्म सिंचन संचाच्या घटकांची तपासणी करण्यात येणार आहे, हे लिहून देणार यांना मान्य आहे. त्यासाठी लिहून देणार तपासणी करणा-या अधिकारी/कर्मचा-यास आवश्यक ते सहकार्य करतील.

७. लिहून देणार यांच्या गोडावूनमधून/साठ्यामधून तसेच शेतक-यांच्या शेतावरुन सुक्ष्म सिंचन संचाच्या तपासणी करावयाच्या घटकांचे नमुने काढण्यास आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यांची लिहून देणार हमी देत आहेत. अशा काढलेल्या नमुन्याबद्दल कोणत्याही प्रकारचे शुल्क शासनास मागणार नाही याची तसेच शेतक-याच्या शेतावरुन नमुने काढले गेल्यास तेवढयाच घटकांचा विनामूल्य पुरवठा शेतक-यांना करण्याची लिहून देणार हमी देत आहेत.

विविध घटकांचे नमुने तपासणीसाठी शासनाने निश्चित केलेल्या कोणत्याही प्रयोगशाळेत पाठवायचे याचा निर्णय घेण्याचा अधिकार कृषि विभागातील अधिका-यांचा राहिल व त्याबाबत लिहून देणार यांची काहीही हरकत असणार नाही याची लिहून देणार हमी देत आहेत.

८. मार्गदर्शक सूचनामाधील परिशिष्ठ -२० नुसार विहित नमुन्यात साठा नोंदवही ठेवण्यास तसेच कंपनीचा अधिकृत प्रतिनिधी व संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून साठा नोंदवही संयुक्तरीत्या प्रमाणित करून घेण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील. साठा नोंदवहीमध्ये ज्या दर्जाचा माल दर्शविण्यात आलेला आहे, त्याच दर्जाचा माल शेतक-यांना पुरविण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील. तसेच सदर साठा नोंदवही कृषि विभागातील कोणत्याही अधिका-यांनी तपासणीसाठी मागितल्यास ती लगेच उपलब्ध करुन देण्याची हमी लिहून देणार देत आहेत.

९. सुक्ष्म सिंचन संचाचा तांत्रिकदृष्टया योग्य व आर्थिकदृष्टया किफायतीशीर आराखडा कंपनीच्या तज्ञ प्रतिनिधीमार्फत तयार करून घेण्याची व त्याप्रमाणेच शेतक-याच्या शेतावर संच उभारणी करण्याची लिहून देणार हमी देत आहेत. ( शेतक-याने यामध्ये स्वतःहून बदल केल्यास ती त्याची जबाबदारी राहील.)

१०. लिहून देणार यांच्यामार्फत सुक्ष्म सिंचन संच उभारणी करताना तांत्रिक/आर्थिक अनियमितता , आर्थिक गैरव्यवहार, शेतक-यांची अथवा शासनाची कोणत्याही प्रकारची फसवणुक घडल्यास, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्यास त्याकरिता लिहून देणार हे जबाबदार राहतील . असे गैरप्रकार घडल्यास प्रशासकीय/ दंडनीय कायदेशीर कार्यवाही करण्यास तसेच आर्थिक गैरव्यवहारात शासनास/शेतक-यांस नुकसान झालेल्या रक्कमेचे वसुली करण्यास लिहून देणार यांची सहमती आहे / राहिल. शासनाची यामध्ये फसवणूक झाल्यास व त्यास शेतकरी / अधिकारी /कर्मचारी जबाबदार असेल तर त्यावर देखील कार्यवाही होईल.

११. तुषार सिंचन संचांवर शेतक-यांचे नाव व गाव, आर्थिक वर्ष याचे ऍम्बॉसिंग (Embossing) करुन देण्याची लिहून देणार हे हमी देत आहेत.

१२. सुक्ष्म सिंचन संच घटकांच्या शासनमान्य सुचक साहित्य गरजे (Indicative Material Requirement) च्या अधिन राहून शेतकऱ्याकडून बिल आकारणी करण्यात येईल याची लिहून देणार हमी देत आहेत.

१३. मार्गदर्शक सूचनांनुसार मान्य असलेल्या तसेच शेतकऱ्यास प्रत्यक्ष पुरवठा केलेल्या घटकांचे / बाबींचे बिल शेतकऱ्यास देणे लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहील. बिलांमध्ये उल्लेख केलेल्या रक्कमेव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव कोणतीही रक्कम शेतक-यांकडून लिहून देणार यांच्यांमार्फत घेण्यात येणार नाही तसेच कोणत्याही प्रकारचे कच्चे / आगाऊ बील शेतक-यांना देण्यात येणार नाही याची हमी लिहून देणार देत आहे.

१४. अनुदानाची रक्कम सरळरित्या संबंधित शेतक-यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येणार असल्याची लिहून देणार यांना माहिती आहे.

१५. प्रस्तावांमध्ये बिल/डिलिव्हरी चलन/इनव्हाईस/सुक्ष्म सिंचन संच आराखडा यावर शेतक-याची स्वाक्षरी घेण्यात येईल याची लिहून देणार हे हमी देतात.

१६. कोणताही गैरप्रकार (उदा. **बीआयएस** मानक नसलेल्या मालाची विक्री करणे, शेतावर संच न बसविता प्रस्ताव तयार / सादर करणे, कमी क्षेत्रावर संच बसवून जादा क्षेत्राचा प्रस्ताव करणे, शेतक-याच्या जमिन धारणेपेक्षा जास्त क्षेत्रावर सुक्ष्म सिंचन संच बसविल्याचे दाखविणे इत्यादी. ) गैरप्रकार करणार नाही याची लिहून देणार हे हमी देतात. असा गैरप्रकारामध्ये शेतक-याने एकाच क्षेत्रावर व जमीन धारणेक्षा जास्त विविध कंपन्यांचे विविध वितरकांकडून संच बसविले असल्यास व शासनाची फसवणूक झाली असे निदर्शानास आल्यास त्यास शेतकरी जबाबदार राहील. पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणल्यास त्याचा तपासणीच्या वेळी विचार करावा.

१७. शासनाच्या विविध विभागांच्या कायद्याच्या अनुषंगाने नियमांतर्गत तरतुदीचे (उदा. मूल्यवर्धित कर (VAT) , विक्री कर) इत्यादीचे पालन लिहून देणार करतील. त्याबाबतच्या सर्व त्रुटींची/परिणामांची जबाबदारी लिहून देणार यांची राहील. त्याबाबत शासनावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक भूर्दंड पडणार नाही याची लिहून देणार हमी देत आहेत.

१८. लिहून देणार यांचेमार्फत शेतक-याकडून घेण्यात येणा-या रक्कमेची पावती तीन प्रतीत ठेवली जाईल, एक प्रत लाभार्थि शेतक-यास, दुसरी प्रत प्रस्तावासोबता जोडून सादर केली जाईल व तिसरी स्थळ प्रत म्हणून ठेवण्यात येईल. या पावतीवर लिहून देणार आणि प्रत मिळल्याबाबत शेतक-याची स्वाक्षरी घेणे लिहून देणार यांचेवर बंधनकारक राहील याची लिहून देणार हमी देत आहेत.

१९. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत (NMSA ) शेतावरील पाणी व्यवस्थापन (OFWM ) या उपअभियानाच्या मार्गदर्शक सुचना सन २०१४ मधील APPENDIX-IA मधील सर्व अटी व शर्ती लिहून देणार यांना मान्य व कबूल आहेत.

२०. सदर करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तींचे लिहून देणार यांनी उल्लंघन केल्यास आयुक्त, कृषि कृषि आयुक्तालय , पुणे /संचालक फलोत्पादन यांनी परित केलेला निर्णय अंतिम राहील व तो लिहून देणा-यावर बंधनकारक राहील. सदर करारनाम्याबाबत कोणताही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास तो लिहून देणार यांच्या नोंदणी झालेल्या जिल्ह्याच्या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात राहील यास लिहून देणार यांची सहमती आहे.

वरील अटी व शर्तीचे पालन न केल्यास लिहून देणार यांची नोंदणी रद्द/निलंबीत करण्यास तसेच लिहून देणार यांच्याविरुध्द कायदेशीर / दंडात्मक कारवाई करण्यास लिहून देणार यांची कोणतीही हरकत नाही. त्यामुळे कंपनीचे/ लिहून देणार यांचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कृषि विभागातील कोणात्याही अधिका-यावर / केंद्र व राज्य शासनावर राहणार नाही तर ती लिहून देणार यांच्यावर राहील याची लिहून देणार हे हमी देतात.

वरील करारनाम्यातील मजकूर , अटी व शर्ती आम्ही वाचलेल्या असून त्या ख-या व बरोबर आहेत व त्या आम्हास मान्य व कबूल आहेत. तसेच त्या आम्ही राजीखुशीने , अक्कलहुशारीने, कोणत्याही दबावास बळी न पडता , समजून व उमजून घेवून करारनाम्यावर आमच्या सहया ....मुक्कामी आज ......रोजी खालील साक्षीदारांसमक्ष केलेल्या आहेत.

स्थळ : .................

दिनांक : ...................

वितरक सिल

VN. Patil

Nahendra K. Dastar

Ravi Gadiwan

Gund Sudan S.

स्वाक्षरी

नाव

साक्षीदार :

१ . सही-

नाव-

पूर्ण पत्ता -

२ . सही-

नाव-

पूर्ण पत्ता -

कार्यालयाचा शिक्का

स्वाक्षरी

नाव

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ............

(लिहून घेणार)

विश्वास पाटील
अध्यक्ष महाराष्ट्र ड्रीप डिलर असोसिएशन

महेंद्र बाविसकर
उपाध्यक्ष महाराष्ट्र ड्रीप डिलर असोसिएशन

विलास मुंडे
सदस्य महाराष्ट्र ड्रीप डिलर असोसिएशन

रवी गाडीवान
सदस्य महाड्रीप

मनिष बोरा
कार्यकारी सचिव, इरीगेशन असोसिएशन ऑफ इंडीया

सुदाम गुंड
अध्यक्ष पुणे ड्रीप डिलर असोसिएशन

०२/१२/२०१४

संचालक फलोत्पादन
कृषि आयुक्तालय पुणे